# जाहिर सुचना

## पनवेल महानगरपालिका

## महिला व बाल कल्याण विभाग

पनवेल महानगरपालिकेतर्फे दिनांक २३ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय विधवा दिन निमित्त "एकल महिला दिवस" साजरा करण्यात येणार आहे. त्या कार्यक्रमाअंतर्गत प्रस्तावित राज्य एकल महिला धोरणात समाविष्ट करण्यात यावयाच्या बाबींविषयी महिलांची मते, सूचना व अपेक्षा जाणून घेण्यात येणार आहेत.

सदर कार्यक्रम ज्येष्ठ नागरिक हॉल, पनवेल येथे सायंकाळी ४.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये एकल महिलांच्या समस्या, अडचणी व गरजा जाणून घेण्यात येणार असून विविध शासकीय योजना, सवलती व उपलब्ध सुविधांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच संबंधित विभागांच्या माध्यमातून आवश्यक मार्गदर्शन करण्यात येईल.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व एकल महिलांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. कार्यक्रमास प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या नमुना अर्ज/फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरून तो महिला व बालकल्याण विभागाकडे अथवा **samup.pmc@gmail.com** या ई-मेल आयडीवर दि. २९/०६/२०२६ पर्यंत पाठवावा.

सही/-

**उपायुक्त**

पनवेल महानगरपालिका

पमपा/ मबाक/जा.क्र. ५७ /२०२६

दिनांक :- १९ / ०६ /२०२६

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल जि. रायगड पिन नं. ४१० २०६

---

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. ०२२-२७४५२२३३ E-mail :- panvelcorporation@gmail.com

---

दिनांक : / /२०२६

पनवेल महानगरपालिका हद्दितील **"एकल महिला"** नोंदणी करावयाचा अर्जाचा नमुना.

लाभार्थ्याचा फोटो

प्रति,
मा.आयुक्त,
पनवेल महानगरपालिका,
पनवेल.

मी श्रीमती __________________________________ माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **माहिती** | |
|---|---|---|
| १ | नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | मोबाईल क्र. | |
| ४ | वय | वय जन्म दिनांक / / |
| ५ | महानगरपालिका क्षेत्रातील वास्तव्याचा कालावधी :- | |
| ६ | स्वरुप | विधवा / घटस्फोटीत / परित्यक्ता / प्रौढ कुमारीका |
| ७ | आर्थिक स्थिती | गृहिणी, नोकरी (शासकिय/खाजगी), व्यवसाय |
| ८ | शिक्षण | |
| ९ | मुलांची संख्या | |
| १० | प्रस्तावित राज्य एकल महिला धोरणात समाविष्ट करण्यात यावयाच्या बार्बीविषयी मते, सूचना आणि अपेक्षा | |

अर्जदाराची सही /-

(नाव :- ________________________________)

**टिप :- सदर माहिती धोरणात्मक निर्णयासाठी संकलिक करण्यात येत आहे. सद्यस्थितीत पनवेल महानगरपालिक तर्फे कोणताही लाभ देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.**